# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# प्रादेशिक बातमीपत्र

# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः 23.09.2022 वारः शुक्रवार

---

ठळक बातम्या

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन बारामती लोकसभा मतदारसंघाच्या दौऱ्यावर; पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना कार्यकर्त्यांना केलं मार्गदर्शन

पंतप्रधान पुढील महिन्यात देशात 5G सेवा सुरु करणार असल्याची केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती

गावांच्या विकासात सरपंचाची भूमिका मोलाची असल्याचं केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचं प्रतिपादन

पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाशी संबंधित देशभरातल्या विविध ठिकाणांवर एनआयएचे छापे; राज्यातही अनेक शहरांत कारवाई

ज्येष्ठ दिग्दर्शक, अभिनेते सतीश आळेकर याना यंदाचा विष्णूदास भावे पुरस्कार जाहीर; राज्य शासनाचे रंगभूमी जीवन गौरव पुरस्कारही जाहीर

**आणि**

**भारत ऑस्ट्रेलिया दरम्यान 20 षटकांचा दुसरा सामना आज नागपूरमध्ये**

**सीतारामन**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन कालपासून बारामती लोकसभा मतदार संघाच्या दौऱ्यावर आहेत. भारतीय जनता पार्टीच्या लोकसभा प्रवास योजने अंतर्गत आयोजित या दौऱ्यात काल सीतारामन यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. आपल्या दौऱ्याकडे २०२४ च्या लोकसभेची पूर्वतयारी म्हणून बघू नये, तर हा दौरा म्हणजे पक्ष मजबूत करण्यासाठी टाकलेलं पाऊल आहे, असं त्या म्हणाल्या. महाविकास आघाडी सरकारच्या काळात ज्या केंद्रीय योजनांची अंमलबजावणी योग्य रीतीने झालेली नाही; त्या योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत असं आवाहन त्यांनी केलं. आगामी निवडणुकांमध्ये बारामती मतदारसंघात बोगस मतदान होऊ नये यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना दिले.

सक्तवसुली संचालनालयासारख्या केंद्रीय संस्थांचा सरकार दुरुपयोग करत असल्याच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रमुख शरद पवार यांच्या आरोपांचं त्यांनी खंडन केलं. केंद्रीय तपास संस्था कोणत्याही प्रकरणाच्या पहिल्या टप्प्यात हस्तक्षेप करत नसून पोलीस अथवा अन्य संस्थांना एखाद्या प्रकरणात काळा पैसा अथवा त्यासारखे गैरव्यवहार आढळून आल्यावर केंद्रीय तपास संस्थांची भूमिका सुरु होत असल्याचं त्या म्हणाल्या.

**फिनटेक**

पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात देशात 5G सेवा सुरु करणार असल्याचं केंद्रीय दळणवळण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल सांगितलं. मुंबईत आयोजित ग्लोबल फिनटेक महोत्सवात ते बोलत होते. पुढल्या दोन वर्षांमध्ये देशाच्या मोठ्या भागात 5G सेवा घेऊन जाण्यात सरकारला यश मिळेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. लोकसभेच्या अर्थविषयक स्थायी समितीचे अध्यक्ष जयंत सिन्हा यांचंही फिनटेकमध्ये भाषण झालं. सध्याच्या जागतिक अस्थिरतेच्या वातावरणात, डिजिटायझेशन आणि डी-कार्बनायझेशन अर्थात कार्बन उत्सर्जन कमी करणे हे दोन घटक भारताच्या आर्थिक

विकासाला चालना देत असल्याचं ते यावेळी म्हणाले. केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड फिनटेकमध्ये बोलताना म्हणाले की डिजिटल व्यवहार, आर्थिक साक्षरता आणि आर्थिक सर्वसमावेशकता याचं प्रमाण भारतात सर्वाधिक असून, अर्थ विषयक सेवा देण्यासाठी नव-तंत्रज्ञानाचा उपयोग करणाऱ्या उद्योजकांना सहकार्य करण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे.

**कपिल पाटील**

देशातील मोठ्या शहरांप्रमाणेच गावांचाही विकास व्हावा ही केंद्र सरकारची भूमिका असून ग्रामविकासाच्या कार्यात ग्रामपंचायत आणि सरपंचाची भूमिका मोलाची असल्याचं केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी काल चिंचवड इथ बोलताना सांगितलं. पंचायती राज मंत्रालयाच्या वतीने, "ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासाच्या ध्येयाचं स्थानीकीकरण" या अंतर्गत "स्वच्छ, हरित आणि जल समृद्ध गाव" या संकल्पनांवर आधारित सरपंचांच्या राष्ट्रीय कार्यशाळेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. दोन दिवस चालणाऱ्या या कार्यशाळेला देशभरातून सुमारे 13शे सरपंच उपस्थित आहेत. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना कपिल पाटील म्हणाले की संयुक्त राष्ट्र संघाने ग्रामीण विकासासाठी जी 17 उद्दिष्ट निश्चित केली आहेत; त्यांची पूर्तता ग्रामपातळीवर झाली तर गावांचा विकास व्हायला वेळ लागणार नाही; मात्र त्यासाठी केंद्र राज्य सरकारचे एकत्रित प्रयत्न आणि मुख्य म्हणजे सरपंचांनी मनात निर्धार करून काम करणं आवश्यक आहे

**गाव के लोगो ने जो सपना देख कर आपको सरपंच बनाया हें जिस तऱ्ह का गाव वो चाहते हे वो बनाने का संकल्प आपको करना हे वो संकल्प आत्मविशवास विकास क्या है जो आपके गाव के लोग है आप विकास कारणे के बाद आपके के लिये आपके गाव के लोगोमे आपको जो आत्मविश्वास दिखेगा वो आत्मविश्वास .....**

यापुढील काळात शाश्वत विकासाच्या अधिकाधिक उदिष्टांची पूर्तता करणाऱ्या ग्राम पंचायतींना पुरस्कार देऊन गौरवण्यात येईल आणि त्या गावच्या सरपंचांसमवेत पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः संवाद साधतील अशी घोषणा पाटील यांनी यावेळी केली.

देश सुंदर बनवायचा असेल तर आधी गाव सुंदर बनवायला पाहिजे असं गिरीश महाजन यावेळी म्हणाले. राज्याच्या महा ई ग्राम पोर्टलचं उद्घाटन यावेळी पाटील यांच्या हस्ते झालं; तर ग्रामविकासावर आधारित 2 पुस्तकांचं प्रकाशनही यावेळी करण्यात आलं.

**नगर आष्टी**

अहमदनगर - आष्टी या नवीन रेल्वे मार्गाचं उद्‌घाटन आज रेल्वे राज्य मंत्री रावसाहेब दानवे पाटील, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज होणार आहे. नवीन आष्टी - अहमदनगर डेमू सेवेला हे मान्यवर हिरवा झेंडा दाखवतील. 66 किलो मीटरची नवीन आष्टी-अहमदनगर ब्रॉडगेज रेल्वे लाईन ही 261 किलो मीटरच्या अहमदनगर - बीड- परळी या नवीन ब्रॉडगेज लाईन प्रकल्पाचा एक भाग आहे. यात केंद्र सरकार आणि राज्य सरकारचा 50-50 टक्के खर्चाचा वाटा आहे.

**एनआयए**

पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाचे नेते आणि सदस्यांविरोधात एनआयएनं 5 गुन्हे दाखल केले आहेत. या प्रकरणी महाराष्ट्रासह देशभरातील विविध राज्यांमध्ये काल तपास मोहीम राबवण्यात आली. पुणे, मुंबई, ठाणे, नवी मुंबईसह राज्यात औरंगाबाद, कोल्हापूर, बीड, परभणी, नांदेड, जळगाव, जालना आणि मालेगाव इथं एटीएसनं ही तपास मोहीम राबवली. दहशतवाद आणि दहशतवादी कारवायांना पैसा पुरवणे, शास्त्रास्त्रांचं प्रशिक्षण देण्यासाठी शिबिरं आयोजित करणे, समाजात धर्माच्या आधारावर तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने हिंसा आणि दहशतवादी कृत्य करण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे आणि बंदी घालण्यात आलेल्या संघटनांमध्ये सहभागी होण्यासाठी जनसमुदायाला एकत्र आणल्याचे या संघेटनेवर आरोप आहेत. या प्रकरणी एनआयएनं 45 जणांना अटक केली आहे.

**नाट्य पुरस्कार**

राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत 2020-21 आणि 2021-22 या वर्षांसाठीचे नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार आणि संगीताचार्य दिवंगत अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार काल जाहीर करण्यात आले.

2020 – 21 साठीचा नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार सतीश आळेकर यांना तर 2021 – 22 साठीचा पुरस्कार दत्ता भगत यांना जाहीर करण्यात आला आहे. 2020 – 21साठीचा संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार दिप्ती भोगले यांना तर 2021 – 22 साठीचा पुरस्कार सुधीर ठाकूर यांना जाहीर करण्यात आला आहे. 5 लाख रुपये, मानचिन्ह आणि मानपत्र असं या दोन्ही पुरस्कारांचं स्वरुप आहे. सांस्कृतिक कार्य विभागानं 2019 आणि 2020 या वर्षासाठीचे सांस्कृतिक पुरस्कारही काल जाहीर केले आहेत.

**आळेकर पुरस्कार**

ज्येष्ठ दिग्दर्शक, अभिनेते, नाटककार आणि पटकथाकार सतीश आळेकर याना यंदाचा विष्णूदास भावे पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीचे अध्यक्ष शरद कराळे यांनी काल सांगलीमध्ये या पुरस्काराची घोषणा केली. यंदा पुरस्काराचं 54 वं वर्ष आहे. रंगभूमीदिनी, 5 नोव्हेंबरला आळेकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्या हस्ते आळेकर यांचा गौरव करण्यात येणार आहे. गौरवपदक, रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, शाल आणि श्रीफळ असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर आकाशवाणीकडे आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना सतीश आळेकर म्हणाले ----

**ज्यांनी मराठी नागरी रंगभूमीचा पाया घातला ते विष्णू दास भावे यांनी या अठराशे बेचाळीस त्रे चाळीस मध्ये जे सीता स्वयंवर नाटक सांगली ,मध्ये केल आणि त्यांच्या नावाने त्या नंतर नाट्य गृह उभ राहील आणि ते नाट्य गृह चालवणारी जी संस्था आहे ती संस्था विष्णू दास भावेंच्या आठवण जतन करण्याच्या साठी म्हणून हा पुरस्कार प्रतिवर्षी देत असते. ही परंपरा आहे कि 1959 पासून हा पुरस्कार देण्यात येतो तो कोणा कोणाला आत्तापर्यंत दिलाय याची जर यादी पहिली तर अक्षरशः म्हणजे थक्क व्हायला होत आणि अतिशय म्हणजे पाय स्थिरावत नाहीत कारण पहिलाच पुरस्कार जो मिळाला होता हा जो बालगंधर्व यांना मिळाला त्या नंतर प्र के अत्रे याना मिळाला मग पु लं ना मिळाला असं करत करत यादी आज यावर्षी माझ्या नावापर्यंत आली हे अतिशय हृद्य आहे आणि हा म्हणजे मराठी रंग भूमिचा रंगभूमीच्या दिनाच्या दिवशी मिळणारा प्रसाद असं मी मानतो प्रत्येक लेखक आपल्या पद्धतीने रंग भूमीवरकाहीतरी करण्याचा प्रयत्न करतो आणि तो परंपरा तोडायचा प्रयत्न करतो आणि नवीन काहीतरी सांगायचा प्रयत्न करत असतो कारण त्या शिवाय नवीन प्रेक्षक त्याच्या समोर येत नाहीत**

**आणि समाजजीवनाचा भाग असल्याने नाटकातून त्याच प्रतिबिंब दिसावं लागत तर असं माझ्या नाटकातून दिसलं का नाही हे मला सांगता येणार नाही त्याची गुणवत्ता काय आहे काय नाही हे ही नाही सांगता येत नाही पण माझी लोकप्रिय नाटकं नसताना ज्याला समांतर धारेतील नाटकं म्हणतात अशा समांतर धारेतील माझी नाटकं असताना सुद्धा या परंपरेने मला गवसणी घातली हे अतिशय हृद्य आहे आणि त्या बरोबर भावे स्मृती समितीचा मी अत्यंत अत्यंत आभारी आहे**

## कास- ई बस

कास पठारावर फुलणारी फुलं पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी यंदाच्या हंगामात 4 ई बस कार्यान्वित करण्यात आल्या असून पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काल त्यांचं दूरस्थ पद्धतीनं लोकार्पण केलं. कास परिसरात पर्यटनाला चालना देण्यासाठी वॉक वे तसेच दर्शन गॅलरी सुरू करणं, स्थानिकांना रोजगाराच्या वाढीव संधी उपलब्ध करून देण्यासाठी आराखडा तयार करणं, सुरक्षा वाढविणं तसंच,घनकचरा व्यवस्थापन याबाबतही कार्यवाही करण्याच्या सूचना यावेळी लोढा यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या.

## लम्पी

लम्पी चर्मरोग नियंत्रण आणि लसीकरणासाठी मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेंतर्गत फिरत्या पशुचिकित्सालय पथकांवर 65 सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीने नेमणुकांचे आदेश काढण्यात आले असल्याची माहिती पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी दिली आहे. तसंच लम्पी रोगाचं नियंत्रण आणि क्षेत्रीय भेटीसाठी जिल्हाधिकारी स्तरावरून वाहने उपलब्ध करून द्यावीत, जास्तीत जास्त लसीकरण करण्यासाठी कंत्राटी मनुष्यबळ आणि खाजगी पशुवैद्यकीय व्यावसायिकांच्या सेवा उपलब्ध करण्याच्या सूचना मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव यांनी दिल्या आहेत.

## चार्जिंग सवलत

सोलापूर शहरातल्या मिळकतधारकांनी आपल्या जागेत स्वतःच्या इलेक्ट्रिक वाहनाकरिता चार्जिंग स्टेशन उभारल्यास आणि त्यातून इतर इलेक्ट्रिक वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास मालमत्ता करामध्ये दोन टक्के सवलत देण्यात येणार आहे. सवलतीचा शहरातील नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ करून घ्यावा तसंच ज्यांनी या सवलतीसाठी

अर्ज केला आहे. अशा घरांची माहिती त्या भागातील मालमत्ता कर अधिकाऱ्यांमार्फत पडताळून पाहिली जाईल आणि त्यानुसार सवलत देण्यात येईल अशी माहिती सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार यांनी दिली.

**अंगणवाडी पाहणी**

केंद्र सरकारच्या महिला आणि बाल विकास विभागाच्या सहसचिव इंद्रा मालो जैन यांनी काल गडचिरोली जिल्ह्याच्या चामोर्शी तालुक्यातल्या घोट इथल्या अंगणवाडीला भेट दिली. स्वस्थ बालक, बालिका स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळालेल्या बालकांना यावेळी त्यांच्या हस्ते पारितोषिकं वितरित करण्यात आली. अंगणवाडी सेविकांनी तयार केलेल्या आहार प्रदर्शनाचीही त्यांनी पाहणी केली.

**इमारत दुर्घटना**

ठाणे जिल्हयातल्या उल्हासनगर उपनगरातल्या कॅम्प क्रमांक पाच इथल्या एका इमारतीच्या चौथ्या मजल्याचा स्लॅब काल थेट तळमजल्याच्या दुकानावर कोसळून झालेल्या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला. काल दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेत एका महिन्याच्या अंतराने तीन इमारतीचे स्लॅब कोसळण्याच्या घटना या भागात घडल्या आहेत. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांकडून ढिगारा उपसण्याचं काम संध्याकाळपर्यंत सुरू होतं.

दरम्यानं महापालिकेनं सुरक्षेचा उपाय म्हणून ही इमारत खाली केली असून इमारतीला स्ट्रक्चरल ऑडिटची नोटीस दिल्याची माहिती सहायक आयुक्त गणेश शिंपी यांनी दिली.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातला 20 षटकांचा दुसरा क्रिकेट सामना आज नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर होणार आहे. संध्याकाळी सात वाजता हा सामना सुरु होईल. मंगळवारी मोहाली इथं झालेल्या सामन्यात भारतावर पाच गडी राखून मात करत ऑस्ट्रेलियानं या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे.

**हवामान**

राज्यातील पावसाचा जोर काहीसा कमी झाला आहे. येत्या तीन दिवसात कोकण मध्य महाराष्ट्र विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.**